Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | पु. ल. देशपांडे ललित गद्य<br>प्रा. डॉ. सुभाष बागल | ४८-५२ |
| १४ | पु. ल. देशपांडे यांची नाट्यसृष्टी<br>प्रा. शिवाजी सिरसाठ | ५३-५६ |
| १५ | पु.ल. देशपांडे : नाट्यात्म आस्वाद<br>प्रा. अर्चना रामचंद्र चव्हाण | ५७-६१ |
| १६ | विनोदाकडे गांभीर्याने बघणाऱ्यांचा पुलोत्सव<br>डॉ. समाधान इंगळे | ६२-६५ |
| १७ | 'बटाट्याच्या चाळी'तील सांस्कृतिक चळवळ<br>प्रा. रेखा कचरूजी मेश्राम | ६६-६८ |





Scanned with CamScanner

# १६. विनोदाकडे गांभीर्याने बघणाऱ्यांचा पुलोत्सव

डॉ. समाधान इंगळे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.

पु. ल. देशपांडे हे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहे. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग असताना महाराष्ट्राने कुणाचा लाड करावा अशी परिस्थिती कधी नव्हती, मात्र महाराष्ट्रातील पोट भरलेल्या आणि ज्यांना एक प्रतिष्ठित विरंगुळ्याची आवश्यकता असते अशा पांढरपेशी समुदायाचे फावल्या वेळात मनोरंजन केल्याने, आणि ह्या वर्गाने सांगेल तेच सर्वमान्य होत असल्याने पु.ल. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व झाले, म्हणायला हरकत नाही. माझ्या गावातील आम्ही शिकलेले मोजके लोक वगळता 'पु. ल. देशपांडे नावाचे कुणी होते', हेच लोकांना माहिती नाही. तसेही निरक्षरांना महाराष्ट्राचे म्हणण्यात कसले आले मोठेपण? एक मात्र अजून असं की, हल्ली पुण्यात सॉफ्टवेअर कंपन्यात पॅकेजवर इंजिनिअरींग करणाऱ्या तरुण मुलामुलींनाही पु. ल. बद्दल विचारले तर, स्वतःचे अज्ञान झाकण्यासाठी किंवा पुण्याची हवा लागल्यामुळे कदाचित असे म्हणूही शकतील की, 'हो हो मागच्याच आठवड्यात पु. लं. ची भेट झाली होती, आणि सोबत चहासुद्धा घेतला वगैरे'. पुलं हे देशपांडे असण्याऐवजी कुणी इंगळे, कांबळे असते तर भावना दुखावल्या किंवा अपमानजनक लेखन केल्याच्या आरोपावरून पुलंना आपल्यातील लेखक मेल्याचे घोषित करावे लागले असते, हे आणखी वेगळेच. 'टवाळा आवडे विनोद' अशी हसवणुकीविषयी शुद्ध भूमिका असलेल्या रामदास स्वामी संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या अभिजनांनी पुलंसाठी ही टवाळखोरी पत्करली असे म्हणायला जोरदार संधी आहे. रामदासांनी विनोदाला एवढं गांभीर्याने घेऊन अस्पृश्य ठरवण्याचे कारण म्हणजे एकतर त्यांचा चेहऱ्यावरून पळून जाणारा पुरुषार्थ त्यांनी चार बोटांच्या कापडात झाकून ठेवला. म्हणजे त्यांच्या फोटोवरून तसा अंदाज बांधता येतो. त्यामुळे भविष्यात या उचापती विनोद्यांनी आपले झाकले तेवढे उघडे पाडू नये, या अति दूरदृष्टीतून त्यांनी विनोदावर बॅन आणला असावा. बहुतेक भविष्यात टीव्ही सारखे आचरट माध्यम येऊन त्यावर अहोरात्र हसवणुकीचे हाऊसफुल्ल कार्यक्रम चालतील आणि सोशलमिडिया नामक टुकार माध्यमातून आपापसात आपल्यावर सतत जोक्स पाठवले जातील ह्याचे भाकीत स्वामींनी जाणले असावे. लेखन करणारी सर्व मंडळी ही स्वामींचा आदेश पाळणारीच होती. विनोदापासून मराठी भाषा, साहित्याला



Scanned with CamScanner

एवढं अस्पृश्य ठरवल्याने भाषा, साहित्य, संस्कृतीचे किती नुकसान झाले असणार? ह्याची कल्पना येते. मराठी एवढी अभिजनांची होऊन बसली, की तिला अभिजात भाषेचा दर्जा भेटायलाही मारामार. कारण आजही विनोदाला गंभीर चेहऱ्याने सामोरे जाणाऱ्या पुणेकरांचे अनेक किस्से ऐकायला, वाचायला मिळतात. रामदासांनी विनोदाला निर्माण केलेली कोंडी पु. ल. देशपांडे यांनी सर्व अंगांनी फोडल्याने त्यांना क्रांतीकारी वगैरे म्हटले तर चालेल का? अशी परिस्थिती आहे. महत्त्वाचे म्हणजे वर्चस्ववादी भावना असणाऱ्या लोकांना विनोद म्हणजे फालतू गोष्ट वाटते, किंवा ती त्यांना परवडणारीही नसते. सनातन, उच्चवर्णीय अशा मंडळींनी पु. लं. देशपांडे यांच्यामुळे विनोदाशी तडजोड केली, हीसुद्धा एक परिवर्तन करणारी गोष्ट आहे, असे म्हणायला हरकत नाही. कदाचित पु. लं. नी पात्र रंगवताना त्या पात्रांविषयी वापरलेली तुच्छतादर्शक भाषा आणि पात्रांचे पितळ उघडे करुन केलेली फजिती ऐकतांना अभिजन रसिक श्रोते व वाचकांना कोण आनंद होत असणार. त्यामुळे स्व - सुखावणारा अनुभव मिळतो.

अशा परिस्थितीत पु.ल.देशपांडे यांच्यासारख्या बहुआयामी कलाकाराने मराठीत विनोद फुलवला. आज घडीला सोशलमिडियावर पु. ल. देशपांडे ह्यांच्यापेक्षा लोकप्रिय लेखक नाही. त्यांच्या नावाने फॉरवर्ड होणारे टेक्स्ट मेसेजेस, व्यक्ती आणि वल्लींचे ऑडिओ, व्हिडिओ जोरदार प्रतिसाद मिळवत आहे. दररोजच्या प्रवासात आम्ही अनेकदा गाणी ऐकण्यापेक्षा पु. ल. देशपांडे यांची कथाकथने किंवा इंदुरीकर महाराजांची कॉमेडी कीर्तनं ऐकत असतो. गीत, संगीत, लेखन, सादरीकरण, अभिनय, दिग्दर्शन अशा एक ना अनेक अंगांनी त्यांचं काम महत्त्वाचं आहेच. आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, नाटक अशा महत्त्वाच्या क्षेत्रात वावरणाऱ्या पु. लं. देशपांडे यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती अचाट आणि अफाट आहे. मुळातच विसंगती, विडंबन, वैचित्र्य, वैगुण्य अशा गोष्टी विनोदासाठी महत्त्वाच्या असतात, ह्याची जाणीव पु. लं. ना चांगलीच होती. उच्च वर्णीय व्यक्तीच्या दृष्टीतूनच ही दिसू शकते. कारण, संपूर्ण आयुष्यभर विडंबन अंगाखांद्यावर घेऊन वावरणाऱ्या कोणत्याही प्रतिभावंताला समाजाच्या वागण्या जगण्यातील अभाव विनोदाच्या अंगाने दिसणार नाहीत, तर कारुण्य आणि मानवतेच्या नजरेतून दिसतील.

पु. ल. देशपांडे यांच्यावर सध्या 'भाई' या चित्रपटाचे दोन भाग आले आहेत. त्यातील पहिल्या भागावर अनेक टीकाही झाल्या. त्यांची पुस्तके आजही ग्रंथालयात आवक - जावक रजिस्टरवर मोठ्या प्रमाणात नोंदवली जातात. समाजाची फार महत्त्वाची भूक त्यांनी आपल्या विनोदी आविष्कारातून भागवली. त्यांनी गंभीरतेनेही लेखन केले आहे. मात्र गंभीर लेखन करणाऱ्या लेखकांच्या तुलनेने त्यातील गांभीर्य पुढे येणारे नव्हते. मराठी साहित्य,



Scanned with CamScanner

नाट्यात विनोदाला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवण्याचे कार्य पुलंनी केले. जर पुलंसारखा अवलिया माणूस मराठीत झाला नसता तर, मराठी भाषा आणि समाज एका फार मोठ्या दालनापासून कायमचाच उपेक्षित राहिला असता.

'गुण गाईन आवडी' सारखे नामांकितांचे रसपूर्ण चरित्र, 'मैत्र' सारखे व्यक्तिदर्शन, 'चार शब्द' हे आस्वादक पुस्तक परीक्षण, 'दाद' मधून आवडणाऱ्या लेखना विषयी केलेलं मर्मग्राही वर्णन, 'राजा ओयदिपौस' या शोकांतिकेचा अनुवाद, 'पोरवय' हे रवींद्रनाथ टागोरांच्या आत्मकथनाचे मर्मग्राही भाषांतर, 'एक झुंज वाऱ्याशी', 'तीन पैशाचा तमाशा', 'तुका म्हणे आता', 'ती फुलराणी' हे आणि अशाप्रकारचे गंभीर लेखनही त्यांनी केले आहे. मात्र उपरोक्त उल्लेखानुसार ते म्हणावे तसे चर्चेत आले नाही. जीवनाचं सहज सोप्प तत्वज्ञान त्यांनी चालता - बोलता जनमानसात पोचवलं. रडवण्यापेक्षा हसवणे सोपे असे म्हटले जाते, पण या वाक्यात तसा काहीच अर्थ नाही.

दरम्यानच्या काळात न्यायालयावरही 'काही गोष्टी विनोदबुद्धीने घ्या, विनोदाला समजून घ्या' असे सांगण्याची वेळ आली आहे. जात, धर्म, शारीरिक ठेवण, महापुरुषे, दैवते यांच्याविषयी समाजाची भावना सध्या फार अनुदार झालेली आहे. आपल्या जात, धर्म, श्रध्दा यांच्याविरुद्ध ऐकण्याची मानसिकता राहिलेली नाही. विनोदबुद्धीच काय, पण या काळाची विवेकबुद्धीसुध्दा क्षीण झाली आहे. आपल्या मनाच्या विरुध्द कुणी लिहिले, बोलले तर त्याला संपवणारी विकृती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या विकृतीचा बिमोड करण्यापेक्षा त्याला गोंजारणारी अविवेकी व्यवस्था प्रस्थापित होत आहे. उदाहरणादाखल 'असा मी असामी' पुस्तकातील पु. ल. देशपांडे यांची काही पात्रमुखी ही विधाने "आमच्यात आणि थोरांच्यात अगदीच साम्य नाही असं नाही. गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपतींप्रमाणं माझ्याही जन्मतिथीविषयी दुमत आहे." किंवा "मी सांगतो बैंबट्या तुला. टिळकास नव्हता धंदा. आणि गांधीस तर मुळीच नाही. साधी बालिष्टरी नाही चालली त्याची. काळा कोट शिवता येईना जुना फाटला तर, तेव्हां राहिला उघडा न् झाला महात्मा।" किंवा "लहानपणी दत्तात्रय हा माझा आवडता देव होता. 'तीन शीऽऽरें सऽहा हातऽ' असलेल्या दत्ताला माझा दर गुरुवारी दंडवत घडत असे. पुढं मला एकदा कुत्रं चावलं आणि 'कार्ले झोऽळि पु@ऽढे श्वानऽ' असलेल्या ह्या देवावरचा माझा विश्वास उडाला. शंकर स्मशानात राहतो हे ऐकल्यापासून मी त्याचीही धास्ती घेतली. मारुतीचं दर्शन आखाड्यातच व्हायचं." या आणि अशाप्रकारे कित्येक श्रद्धेय गोष्टींवर जवळपास सर्वच पुस्तकातून त्यांनी खुसखुशीत विनोद पेरले आहेत. सर्वांगाने, सर्वार्थाने मराठीची सेवा करणाऱ्या या सेवेकऱ्याला मराठी भाषिकांनी डोक्यावर घेतले, तर हे पड्डे अजूनही उतरायला तयार नाहीत. तरीही विनोद करणारांची सध्या खूप चलती आहे.



Scanned with CamScanner

स्टँडिंग कॉमेडीच्या शीर्षकाखाली टी. व्ही., युट्यूब चॅनेल्सवर अहोरात्र धुमाकूळ सुरू आहे. हिंदीतील 'कॉमेडी नाईट विद कपिल शर्मा' किंवा झी मराठीवरील 'चला हवा येऊ द्या' हे विक्रमी टीआरपी कमावणारे चलनी कार्यक्रम आहेत. पु. ल. देशपांडे यांचे हसवणुकीच्या प्रोफेशनचे अनेक वारसदार आज धन आणि मान धरून आहेत. हास्य कविसंमेलनांना आज प्रचंड डिमांड आहे. जागतिकीकरणानंतर आपल्याजवळ हसण्याशिवाय काहीही शिल्लक नाही, हे एव्हाना मराठी लोकांनाही कळले आहे.

पु. ल. देशपांडे यांचा व्यापक वावर बघता त्यांच्याकडून अपेक्षाही अर्थात जास्तच होत्या. त्यांनी अमुकतमुकच लिहिले आहे आणि अमुकतमुक का नाही लिहिले? असे प्रश्न निर्माण होऊ शकतील. मात्र एक गोष्ट नक्की आहे की, हे वर्ष आपण पु. ल. देशपांडे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करताना पु. लं.च्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा कलाकार तयार होऊ देऊ का? आणि झालाच तर 'त्याने आमच्या अस्मितेला ठेच पोहचवून लोकांना हसवल्यामुळे' एखाद्या सनातन्याने गोळ्या घालून संपवल्याची घटना घडू शकण्याची जास्त शक्यता वाटते. तात्पर्य एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करताना त्यांच्या भूमिकेचाही गौरव व्हावा. करणी सेना, बजरंग दल, हिंदू महासभा, सनातन संस्था सारख्या अतिसंवेदनशील संघटना अभिव्यक्तीच्या सर्वच घटकांवर स्वयंघोषित सेन्सॉरशीप लादत आहेत. हे नाकारता येत नाही.



Scanned with CamScanner